# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
## मा.स्थायी समिती

## कार्यपत्रिका क्रमांक - १७
## सभावृत्तांत

दिनांक - ३१.७.२०१२ वेळ - दुपारी ३:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार दिनांक ३१.७.२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगदीश शेट्टी सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.पाडाळे निता विलास
८) मा.जावेद रमजान शेख
९)मा.जगताप नवनाथ दत्तु
१०) मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर
११) मा.भोसले राहुल हनुमंतराव
१२) मा.चोंधे आरती सुरेश
१३) मा.भालेकर अरुणा दिलीप
१४) मा.अश्विनी गजानन चिंचवडे - पाटील
१५) मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.मुंढे, मा.कारचे, मा.ढेरे, मा.झुरे,मा.कुलकर्णी,मा.दुरगुडे, मा.बंब - सहा. आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे -विकास अभियंता, मा.चव्हाण,मा.तुपे - सह शहर अभियंता,मा.भोसले - मुख्यलेखापाल, मा. डॉ.जगदाळे - प्र.आरोग्य वैद्यकीय अधिकारी, मा.भदाणे - उपसंचालक (नगररचना), मा.दुधेकर,मा.बनकर, मा.ढगे, मा.निकम,मा.सवणे,मा.इंगळे,मा.पाटील, मा.जाधव,मा.कुदळे,मा.जाधव, मा.चिंचवडे, मा.थोरात,मा.साळवी,मा.पठाण, मा.कुलकर्णी,मा.पिरजादे,मा.दांगट - कार्य.अभियंता, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक,मा.चव्हाण - आरोग्य कार्यकारी अधिकारी, मा.पाटील - प्रशासन अधिकारी,मा.इंदलकर-कामगार कल्याण अधिकारी,मा.जगताप - समाजकल्याण अधिकारी, मा.गावडे-अग्निशामक अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>

विषय क्रमांक : १९) संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाबाबत..
विषय क्रमांक : २०) सेवाकर तज्ञ नेमणुकीबाबत..
विषय क्रमांक : २१) येरवडा मध्यवर्ती कारागृह यांचेकडुन अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल खरेदीबाबत..
विषय क्रमांक : २२) जलक्षेत्र मध्ये टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी तरतुद वर्ग करणेबाबत..
विषय क्रमांक : २३) क मुख्यालय वॉर्ड साठी विविध मनपा कार्यक्रमांसाठी मंडप व्यवस्था व अनुषंगिक कामे करणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : २४) कायदा सल्लागार अभिनामाचे रिक्त पद एकत्रित मानधनावर भरणेबाबत..
विषय क्रमांक : २५) ट्रान्सपोर्ट नगर येथील जकात नाक्याजवळील रिकामी जागा भाडयाने देणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : २६) कै.सिताराम भागुजी लोंढे उद्यान अंशतः अनुदान तत्वावर देखभालीस देणेबाबत..मा.अश्विनी चिंचवडे,मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : २७) KNEE HIGH TECHMODULAR PROSTHESIS खरेदी करणेबाबत..मा.सुभद्रा ठोंबरे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : २८) ठरावात दुरुस्ती करणेबाबत..मा.सुभद्रा ठोंबरे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : २९) जाहिरातीकरीता परवानगी देणेबाबत..मा.अश्विनी चिंचवडे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३०) संत तुकाराम नगर येथील पाण्याचे मीटर बसविणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३१) अ,ब,क व ड प्रभाग कार्यालयातील प्रभाग अध्यक्षांना कार्यालयीन वापरासाठी नव्याने ॲम्बेसिडर/मांझा कंपनीचे वाहन खरेदीबाबत.. मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३२) सन २०१२ - १३ चे अंदाजपत्रक तरतुद वर्ग करणेबाबत..मा.विनया तापकीर,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३३) संगणक प्रशिक्षण देण्याबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३४) निगडी प्राधिकरण येथील लॉन टेनिस कोर्ट भाडे तत्वावर चालविणेस देणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव..
विषय क्रमांक : ३५) पिंपरी चिंचवड शहरातील मैदाने स्पर्धेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत..मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३६) मनपाच्या अंदाजपत्रक ३ मधील स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षावर वाढ घट करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३७) स्थापत्य ब प्रभागातील कामासाठी तरतुद वर्ग करणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३८) बिना इंग्लिश मिडीयम स्कुल आकुर्डी येथील कार्यक्रमाची व्यवस्था करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ३९) ठराव क्र.१६३३६ मध्ये दुरुस्ती करणेबाबत..मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव..

विषय क्रमांक : ४०) मानधनावर नेमणुक देणेबाबत..मा.आरती चोंधे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव..

--------

मा.अश्विनी चिंचवडे:- मा.स्थायी समिती सभा दिनांक २४/७/२०१२ ठराव क्र.८३३ मध्ये 'यांचा प्रस्ताव' या मजकुरानंतरचा व 'सदर ठराव' या मजकुरा अगोदरचा सर्व मजकुर वगळुन त्याऐवजी 'विषय क्र.२२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.' हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत यावी.

मा.स्थायी समिती सभा दिनांक २४/७/२०१२ ठराव क्र.८३३ मध्ये 'यांचा प्रस्ताव' या मजकुरानंतरचा व 'सदर ठराव' या मजकुरा अगोदरचा सर्व मजकुर वगळुन त्याऐवजी 'विषय क्र.२२ दप्तरी दाखल करणेत येत आहे.' हा मजकुर नमुद करणेची दुरुस्ती करणेत आल्याचे व त्या दुरुस्तीसह दिनांक २४/७/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्र.१६) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक - ८४० विषय क्रमांक - १
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मध्यवर्ती साहित्य भांडार वैद्यकीय
सुचक :- मा.अविनाश टेकावडे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मसाभां/५/कावि/४४०/१२ दि. १९/७/२०१२
विषय :- मनपा दवाखाना/रुग्णालयातील लिनन (कपडे) धुलाईबाबत..

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४१ विषय क्रमांक - २
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - आरोग्य मुख्य कार्यालय
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आमु/४/कावि/३८७/१२ दि. २०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

यांत्रिक पध्दतीने जंतुनाशक व किटकनाशक औषध फवारणी करणे याकामाची नविन निविदा प्रक्रिया चालू असून त्यासाठी काही कालावधी लागणार असल्याने सद्यःस्थितीत पावसाळ्याचे दिवस असल्याने प्रभाग कार्यक्षेत्रात यांत्रित पध्दतीने औषध फवारणी करणे गरजेचे असल्याने मे.मल्हार एंटरप्रायजेस यांना नि.क्र.३/२०१०-११ अन्वये अ, ब, क ड प्रभागासाठी दिलेल्या मंजुर निविदा दराने (प्रति दिन ८ तासाकरिता प्रति युनिट) चे कामासाठी अ, ब, क ड प्रभाग कार्यक्षेत्रामध्ये यांत्रिक पध्दतीने जंतुनाशक व किटकनाशक औषध फवारणी करणेकामी ३ महिने कालावधीकरिता मुदतवाढ देणेस व त्याकामी प्रत्यक्ष येणाऱ्या र.रू.५,०४,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४२ विषय क्रमांक - ३
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - कामगार कल्याण विभाग
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.काक/२/कावि/४३६/१२ दि. २०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपा कर्मचारी श्री.कांबळे डी.डी., जकात निरिक्षक, श्री.गायकवाड व्ही.एम. मुख्यलिपिक, श्री.जाधव अशोक एस. शिपाई यांना श्रवणयंत्रे खरेदीकामी र.रू.१,३०,८७५/- [र.रू.एक लाख तीस हजार आठशे पंच्याहत्तर] इतका खर्च झालेला असून सदरचा खर्च हा नागरवस्ती विभागाकडील 'अपंग कल्याणकारी योजना' या लेखाशिर्षावर खर्ची टाकण्यात आला असून सदरच्या खर्चास कार्योत्तर व यापुढे अंध क्षीणदृष्टी, मुकबधीर व अस्थिव्यंग कर्मचाऱ्यांना त्यांनी मागणी केल्यानुसार त्यांची कर्तव्ये व जबाबदाऱ्या पार पाडण्यासाठी शासनमान्य संस्थेकडून उपकरणे खरेदी करणेसाठी होणाऱ्या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४३ विषय क्रमांक - ४
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - उद्यान विभाग
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.उद्यान/४/कावि/३४४/१२
दि. १९/७/२०१२

मा. महापालिका अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मनपाच्या उद्यान विभागाकडील नि.नो.क्र.२/२०१२-२०१३ मधील अ.क्र.४ अन्वये, मनपाचे चिखली रोपवाटीका येथे माती, प्लॅस्टीक पिशव्या यांचा पुरवठा करून माती, खत एकत्रीत करून पिशव्या भरून बेडला लावणेकामी मे.प्रियंका एन्टरप्रायजेस (नि.र.रू.४,२३,७०७/- [र.रू.चार लाख तेवीस हजार सातशे सात] पेक्षा १७.७५ % कमी)

या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४४ विषय क्रमांक - ५
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय
सुचक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:-मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/१अ/कावि/४९/१२ दि. २०/७/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

वाय.सी.एम.रूग्णालयाच्या बायोमेडिकल वेस्ट (मॅनेजमेंट व हॅडलिंग) नियम १९९८ नुसार परवाना नुतनीकरणाकामी येणारा र.रू.१,०२,०००/- [र.रू.एक लाख दोन हजार] खर्च रूग्णालयाचे इतर खर्च या लेखाशिर्षातून अदा करणेस व सदरची रक्कम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांना अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४५ विषय क्रमांक - ६
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - नगरसचिव
सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.प्रभारी नगरसचिव यांचे जा.क्र.नस/१/कावि/९७२/१२ दि. १९/७/२०१२

मा. प्रभारी नगरसचिव यांनी शिफारस केलेप्रमाणे.

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४६ विषय क्रमांक - ७
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - विद्युत मुख्य कार्यालय
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वि/नि/१अ/कावि/३८५/१२ दि. २१/७/२०१२
विषय :- चिखली मैलाशुध्दीकरण केंद्र नवे व जुने यांची देखभाल करणेबाबत..

विषय क्रमांक ७ चा विचार दि.४/९/२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४७ विषय क्रमांक - ८
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक :- मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.मुख्य लेखापरिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/७९१/१२
दि. १९/७/२०१२

मा.मुख्य लेखापरिक्षक यांनी शिफारस केलेप्रमाणे.

मुख्यलेखापरिक्षण विभागामध्ये कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेप्रमाणे रजा मंजूरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४८ विषय क्रमांक - ९
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - वायसीएमएच
सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वि/मुंपुर,वायसीएमएच /११०/१२
दि. १७/७/२०१२

मा. महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

वाय.सी.एम.हॉस्पीटल येथील लिफ्ट्स चे वार्षिक देखभाल दुरुस्ती (सन २०१२ ते २०१३) मे.ओटीस इलेव्हेटर या उत्पादक कंपनीकडून पुढील एक वर्ष कालावधीकरीता थेट पध्दतीने करारनामा करून, करवून घेणेस व त्याकामी येणारा खर्च र.रू.५,२०,७९९/- [र.रू.पाच लाख वीस हजार सातशे नव्यान्नव] मे.ओटीस इलेव्हेटर कं.यांस आगावू अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८४९ विषय क्रमांक - १०
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. प्रशा/११/कावि/१०८३/१२
दि. २३/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -.

शासन निर्णयात नमुद केल्यानुसार प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे घरबांधणी व इतर अग्रिमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेची मागणी मा.आयुक्त यांजकडुन करणेत आली असली तरी घरबांधणी अग्रीमसाठी वर्ग १ रुपये १५ लाख,वर्ग २ साठी रुपये १४ लाख,वर्ग ३ साठी रुपये १३ लाख, वर्ग ४ साठी रुपये १२ लाख मध्ये घर विकत घेणे अशक्य आहे. तसेच घरांच्या किंमती रुपये १५ लाखपेक्षा जास्त असल्यामुळे वर्ग १ ते ४ मधील सर्व अधिकारी व कर्मचा-यासाठी रुपये २० लाख घरबांधणी अग्रीम मंजुर करण्याची दुरुस्ती करुन त्यासह घरबांधणी व इतर अग्रीमासाठी सुचविलेल्या धोरणास व अटीस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक - ८५०　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - ११
दिनांक - ३१/७/२०१२　　　　　　　　　　　　　विभाग - विद्युत मुख्यालय
सुचक :- मा.सुभद्रा ठोंबरे　　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वि/नि/५/कावि/१०७/१२
दि. २५/७/२०१२
विषय :- तालेरा रुग्णालय विस्तारीकरणाबाबत..

विषय क्रमांक ११ चा विचार दि.४/९/२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५१　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १२
दिनांक - ३१/७/२०१२　　　　　　　　　　　　　विभाग - विद्युत मुख्यालय
सुचक :- मा.अविनाश टेकावडे　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.नवनाथ जगताप
संदर्भ:- मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. वि/नि/५/कावि/१०८/१२
दि. २५/७/२०१२
विषय :- तालेरा विभागातील विद्युत विषयक कामे करणेबाबत..

विषय क्रमांक १२ चा विचार दि.४/९/२०१२ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५२　　　　　　　　　　　　　　विषय क्रमांक - १३
दिनांक - ३१/७/२०१२　　　　　　　　　　　　　विभाग - जकात
सुचक :- मा.विनया तापकीर　　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- १) मा. महापालिका आयुक्त यांचे जा.क्र. जकात/१०/कावि/९९/१२
दि. १९/३/२०१२
२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.३५

पिंपरी चिंचवड महानगरपालिका जकात नियम २००१ चे अनुसूची १ व २ मधील दर समानिकरणाकामी प्रस्तावा सोबत प्रपत्र अ जोडले असून त्यामध्ये प्रपत्र ब च्या यादीप्रमाणे एकूण १८ बाबींच्या नमूद मालावर प्रस्तावित केलेले सुधारित जकात दर कायम करणेस व त्या प्रमाणेचे अनुसुचीबाबत नागरिकांच्या हरकती सुचना मागविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५३　　　　　　　　　　विषय क्रमांक - १४
दिनांक - ३१/७/२०१२
सुचक :- मा.जावेद शेख　　　　　　　　　　अनुमोदक :- मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- १) मा. जितेंद्र ननवरे, मा.आशा सुपे यांचा प्रस्ताव
२) मा.विधी समिती सभा दिनांक २१/०७/२०१२ ठराव क्र.४३

प्रभाग स्तरावर स्थापत्य, विद्युत, पाणीपुरवठा, आरोग्य, प्रशासन, मलनिःसारण इ. विभागीय कामे करणेत येतात. सद्यस्थितीत प्रभाग स्तरावर प्रभाग अधिकारी यांना १०,००,०००/- पर्यंतच्या प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरी देणेचा अधिकार आहे. प्रभागाच्या कामकाजाचे व्याप्तीत वाढ झाल्यामुळे खर्च मर्यादा १०,००,०००/- ऐवजी २५,००,०००/- पर्यंत प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजूरीचे अधिकार सर्व प्रभाग

समित्यांना देणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५४ विषय क्रमांक - १५
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे
संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/४६/१२
दि. २६/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२५.६.१२ ते १.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४६/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५५ विषय क्रमांक - १६
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.अरुणा भालेकर अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे
संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/४७/१२
दि. २६/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.२.७.१२ ते ८.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४७/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५६ विषय क्रमांक - १७
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.राहुल भोसले अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/४८/१२
दि. २६/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.९.७.१२ ते १५.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४८/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५७ विषय क्रमांक - १८
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मुलेप
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:- मा. मुख्य लेखा परिक्षक यांचे जा.क्र. मुलेप/१/कावि/४९/१२
दि. २६/७/२०१२

प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ (१) अन्वये लेखापरिक्षण विभागातील दि.१६.७.१२ ते २२.७.१२ अखेर संपणा-या आठवड्याचा, मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्र.मुलेप/१/कावि/४९/२०१२ दि.२६.७.२०१२ अन्वये पाठविलेला साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा अहवाल अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.

ठराव क्रमांक - ८५८ विषय क्रमांक - १९
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - क प्रभाग विद्युत
सुचक :- मा.जावेद शेख अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:- मा. प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र. कप्र/वि/५९७/१२ दि. ३०/७/२०१२

मा.प्रभाग अधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे.

संत तुकाराम महाराज पालखी सोहळयातील दि.१२/६/२०१२ रोजी तात्पुरत्या स्वरुपात प्रकाश व्यवस्था करणे हे काम करारनामा न करता मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲण्ड अले.निगडी , पुणे - ४४ यांचेकडुन करुन घेणेस व त्याकामी होणा-या खर्चास र.रु.२,४०,०००/- चे कामास मा.आयुक्त सो. यांनी दिनांक ८/६/१२ चे प्रस्तावास मान्यता दिली आहे. कामाची गरज व तातडी लक्षात घेता सदर काम निविदा न मागविता कोटेशन मागवून थेट पध्दतीने मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲण्ड इले.निगडी पुणे - ४४ यांचेकडुन पुर्व स्विकृत दर (२.७% कमी) या दराने पुर्ण करुन घेणेत आले आहे. सदर कामास झालेला खर्च र.रु. २,४०,०००/- इतका मिळणेबाबत एजन्सीने बिल सादर केले आहे. सदर कामाचे करारनामा न करता बील रक्कम रु.२,४०,०००/- (पुर्व स्विकृत दर २.७% कमी या दराने) मे.त्रिमुर्ती मंडप स्पिकर्स ॲण्ड अले.निगडी पुणे ४४ यांना अदा करणे गरजेचे आहे. सदर कामास व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८५९ विषय क्रमांक - २०
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - आकाशचिन्ह व परवाना
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.आप/३/कावि/५९/१२
दि. ३०/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

सेवाकर विभागाने सुनावणीमध्ये नियमानुसार लागु होणा-या दंडास सुट दिली असून त्यांच्या सेवाकराची मुळ मागणी रक्कम रुपये १,१७,९५,३९७/- ही व्याजासह भरावी असे निर्देश आहेत. मनपामार्फत जाहिरातदार यांचेकडुन वसुल करण्यात येणारे जाहिरात कर व परवाना फी या बाबी मनपाचा कर असल्याने त्यावर सेवाकर लागू होत नाही असे या कार्यालयाचे मत आहे. त्यामुळे व सदर रक्कम खुप मोठी असल्याने

त्याविरुध्द ट्रायब्युनलमध्ये अपिल करावयाचे ठरले आहे. अपिलाचा कालावधी कमी असल्याने सुनावणीमध्ये मनपाची बाजू सादर करणेसाठी तज्ञ व्यक्तींची आवश्यकता असलेने सर्व चौकशीअंती ॲड नारायणन ॲंड असो.या कायदा तज्ञांची नियुक्ती करणे योग्य होणार असल्याने सदरचे अपिलामध्ये निर्णय होईपर्यंत ते मनपाचे प्रतिनिधीत्व करणार आहेत. ॲड नारायण यांनी सदर कामासाठी प्रस्तावात नमुदप्रमाणे फी ची र.रु.५०,०००/- व त्यावर नियमाप्रमाणे सेवाकर मागणी केली आहे व ती योग्य असुन सदर केलेल्या नेमणुकीस मान्यता तसेच सदरचा खर्च कायदा विभागाकडील दावे व खटले यासंबंधी खर्च या लेखाशिर्षातुन करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६० विषय क्रमांक - २१

दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - मध्यवर्ती भांडार

सुचक :- मा.नवनाथ जगताप अनुमोदक :- मा.राहुल भोसले

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.मभां/५/कावि/२/१२

दि. ३१/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

महापालिकेच्या विविध विभागांना तातडीने आवश्यक असलेले अभिलेखाचे रेकॉर्ड बांधण्याचे कापडी रुमाल विविध रंगात निविदा न मागविता, करारनामा न करता थेट पध्दतीने येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांचेकडुन दर प्रति नग र.रु. ५०/- (जकात,वाहतुक इ.कर वगळून) प्रमाणे एकुण १०००० नग कापडी रुमाल विविध रंगात ३६" x ३६" साईजमध्ये नाडीसह, मनपा बोधचिन्ह छपाईसह, खरेदी करण्यास व येणा-या र.रु. ५,००,०००/- अधिक जकात, वाहतुक खर्च इत्यादी करासह येणा-या प्रत्यक्ष खर्चास तसेच सदरची रक्कम मा.प्रशासन अधिकारी येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे यांना आगाऊ स्वरुपात अदा करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६१ विषय क्रमांक - २२

दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - क प्रभाग पाणीपुरवठा

सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.कप्र/पापु/७/कावि/३१/१२

दि. २७/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे.

सन २०१२-१३ मध्ये अंदाजपत्रक पान क्र.७९३ अ.क्र.४३,४४ या दोन कामांच्या तरतुदी एकत्रित र.रु.११,००,००० ही जलक्षेत्र क्र.ब/९,ब/१०,ब/११ मध्ये टाकीवरील वितरण व्यवस्थेसाठी ठेकेदारी पध्दतीने मजुर पुरविणे कामास वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६२ विषय क्रमांक - २३
दिनांक - ३१/७/२०१२
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे

संदर्भ:- मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव.

क प्रभाग स्थापत्य विभागामार्फत क मुख्यालय वॉर्ड ९,२३,२४,२५,२६ व १७ साठी विविध मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था व अनुषंगिक कामे करणेचे काम ठेकेदार मे.लालदीप कन्स्ट्रक्शन यांचे निविदा क्र.१/१५-२०११/१२ अन्वये चालु आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सार्वजनिक निवडणुक २०१२ साठी मा.आयुक्त यांचे आदेश क्र.निवडणुक /कावि/६/२०१२ दि.१८/१/२०१२ अन्वये मतदान केंद्राचे व मतमोजणी केंद्राचे ठिकाणी फर्निचर व्यवस्था करणे व आवश्यकतेनुसार मंडप उभारणी करणे,बॅरिकेटींग करणे इ.कामे संबंधित कार्यकारी अभियंता यांनी त्यांचे कडील चालु असलेल्या वार्षिक स्वरुपाचे कामातून करणेबाबत आदेश दिले आहे. त्यानुसार निविदा क्र.१/१५-२०११/१२ अन्वये चालू असलेल्या कामातून सार्वत्रिक निवडणुक २०१२ साठी निवडणुक निर्णय अधिकारी २,८ व ९ साठी आवश्यक कामे करण्यासाठी सुधारित अंदाजपत्रक तयार करणेत आलेले असून त्यासाठी मुळ कामाचा खर्च र.रु.७,४६,३००/- आणि निवडणुक कामासाठी खर्च र.रु. ८,६०,०००/- असा एकुण सुधारित खर्च र.रु.१६,०६,३००/- इतका खर्च अपेक्षित असुन सदर खर्चासाठी मा.आयुक्त यांनी दि.२४/१/२०१२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सबब सदर कामासाठी र.रु.१६,०६,३००/- चे सुधारित खर्चास (वाढीव र.रु.८,६०,०००/-) मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६३ विषय क्रमांक - २४
दिनांक - ३१/७/२०१२ विभाग - प्रशासन
सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.प्रशा/१/कावि/७१२/१२ दि.३१/७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रस्तावात नमुद प्रमाणे ॲड सदानंद देशमुख यांना कायदा सल्लागार या पदावर एकत्रित मानधन र.रु. २५,०००/- अधिक वाहन व्यवस्था व मोबाईल सेवेसह ६ महिने कालावधीसाठी नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६४ विषय क्रमांक - २५
दिनांक - ३१/७/२०१२
सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

ट्रान्सपोर्ट नगर येथील जकात नाक्याजवळील ८' x १०' ची रिकामी जागा सिताराम रामफकीर गुप्ता यांना हॉटेल व्यवसाय या कामाकरीता मा.उपसंचालक नगररचना ठरवतील त्या भाडयाने २५ वर्षे कालावधी करीता देण्यास व त्याकामी करारनामा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------- ---

ठराव क्रमांक - ८६५ विषय क्रमांक - २६

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा.सुभद्रा ठोंबरे

संदर्भ:- मा.अश्विनी चिंचवडे,मा.सुभद्रा ठोंबरे यांचा प्रस्ताव -

कै.सिताराम भागुजी लोंढे उद्यान जिजाऊ महिला विकास मंडळास ५ वर्षे कालावधी करीता योग्य त्या अंशतः अनुदान तत्वावर देखभाल संरक्षणाकामी देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६६ विषय क्रमांक - २७

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा. सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा. अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.सुभद्रा ठोंबरे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेचे, राजीव गांधी माध्यमिक विद्यालय, नेहरुनगर पिंपरी पुणे -१८ येथील अपंग (अस्थिव्यंग) शिक्षक श्री.संपत गोविंद पानसरे यांनी RIGHT ABOVE KNEE HIGH TECHMODULAR PROSTHESIS ची मागणी केलेली आहे. त्यासाठी त्यांनी PROACTIVE TECHNICAL ORTHOPAEDICS, NIGDI यांचेकडील र.रु. १,४१,०००/-(अक्षरी रक्कम रुपये एक लाख एक्केचाळीस हजार) चे कोटेशन सादर केलेले आहे. श्री.पानसरे यांनी मागणी केलेले RIGHT ABOVE KNEE HIGH TECHMODULAR PROSTHESIS मे. प्रोॲक्टीव्ह टेक्नीकल आर्थोपेडीक्स, निगडी यांचेकडुन थेट पध्दतीने खरेदी करण्यास व त्याकामी येणा-या र.रु. १,४१,०००/- चे खर्चास तसेच येणारा खर्च नागरवस्ती विभागाकडील अपंग कल्याणकारी योजना या लेखाशिर्षावरुन करण्यास मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६७ विषय क्रमांक - २८

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा. सुभद्रा ठोंबरे अनुमोदक :- मा. अश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.सुभद्रा ठोंबरे,मा.अश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.१३४६१ दि.१/२/२०११ मध्ये (मनपा/शासन कराव्यतिरीक्त) हा मजकुर वगळुन त्याऐवजी (मनपा/शासन करासह) हा मजकुर समाविष्ट करण्याची दुरुस्ती करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६८ विषय क्रमांक - २९

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.अश्विनी चिंचवडे अनुमोदक :- मा. आरती चोंधे

संदर्भ:- मा.अश्विनी चिंचवडे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील चिंचवड स्टेशन ते चाफेकर चौकापर्यंत रस्ता दुभाजकामध्ये असणारे ४० सो व्हेपर पोल तसेच दत्त नगर बिर्ला हॉस्पिटल ते डांगे चौक एकुण ४० चाळीस सो व्हेपर पोलवर (रस्ता दुभाजकामधील) निविदा न काढता मनपा दरापेक्षा र.रु. ३०० प्रतिपोल दर महा या दराने मे समर्थ अँड प्रोप्रा श्री.गिरीष बालगुडे यांना थेट पध्दतीने ५ (पाच) वर्षे कालावधीकरीता जाहिरात करणेकरीता परवानगी देणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८६९ विषय क्रमांक - ३०

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोनकांबळे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

संत तुकाराम नगर येथील राज्य परीवहन मंडळ आगारात दोन पाण्याचे मीटर बसविले असून पाण्याचा वापर प्रवाशांना पिण्यासाठी करीत असल्याने सदर नळ कनेक्शनची बिले निवासी दराने आकारण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७० विषय क्रमांक - ३१

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे

संदर्भ:- मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ,ब,क व ड प्रभाग कार्यालयातील प्रभाग अध्यक्षांना मनपा कार्यालयीन वापरासाठी नव्याने ॲम्बेसिडर/मांन्झा कंपनीचे वाहन कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांमार्फत थेट पध्दतीने खरेदी करणेकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७१ विषय क्रमांक - ३२

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.विनया तापकीर अनुमोदक :- मा.आरती चोंधे

संदर्भ:- मा.विनया तापकीर,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या सन २०१२ -१३ चे अंदाजपत्रकामध्ये क प्रभागातील कामांसाठी खाली नमुद केल्याप्रमाणे तरतुद वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ. क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रक लेखाशिर्ष/पान क्र. | सन २०१२-२०१३ ची तरतुद | सुधारीत सन २०१२-२०१३ चा अंदाज | वाढ करावयाची तरतुद | घट करावयाची तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.१२ अंतर्गत विविध ठिकाणी टी.डी.आर.च्या बदल्यात मनपाच्या ताब्यात आलेले रस्ते खडीकरण करणे (पठारेमळा रस्ता) | विशेष योजना पान क्र.२४/५४ | १२५०००० | २०००००००० | १८७५०००० | ० |
| २ | पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील पुणे-आळंदी रस्त्यावरील सेवा वाहिनीची (पाणी पुरवठा,जलनिःसारण विद्युत) कामे करणे | विशेष योजना पान क्र.२५/६५ | ५०००००० | १००००० | ० | ४९००००० |
| ३ | पुणे -आळंदी रस्ता (च-होली फाटा) ते नियोजित पुलापर्यंतच्या (इंद्रायणीनदी) विकास आराखडयातील रस्ता विकसित करणे | विशेष योजना पान क्र.२५/६६ | ५०००००० | १०५०००० | ० | ३९५०००० |
| ४ | रोड पेव्हमेंट सिस्टिम अहवालानुसार रस्ते सुधारणा रस्ते सुधारणा अंतर्गत कामे करणे | विशेष योजना पान क्र.२६/०२ | १००००००० | १००००० | ० | ९९००००० |
| २ | क प्रभागातील रस्ते | एकुण | २१२५०००० | २१२५०००० | १८७५०००० | १८७५०००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७२ विषय क्रमांक - ३३

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.सुषमा तनपुरे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड मनपा नागरवस्ती विकास योजने अंतर्गत महिला व बाल कल्याण विभागामार्फत महिला व मुलींना आणि मागासवर्गीय कल्याणकारी योजने अंतर्गत महिला, मुली व मुले यांना संगणक प्रशिक्षण महाराष्ट्र स्टेट सर्टीफिकेट कोर्स इन इनफोरमेशन टेक्नोलॉजी चे प्रशिक्षण देणेकामी विद्यार्थ्यांच्या व नागरीकांच्या सोयी करीता दर्जेदार संगणक प्रशिक्षण मिळणेकरिता MKCL मान्यता प्राप्त किमान १० वर्षे मान्यता असलेल्या आणि पिंपरी चिंचवड महापालिकेच्या संगणक प्रशिक्षणाचा अनुभव असलेल्या खालील संस्थांची प्रशिक्षण देणेकामी ३६ महिने करिता नेमणुक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

१) सक्सेस कॉम्प्युटर एज्युकेशन ऍकेडमी
२) जिनीअस कॉम्प्युटर इन्स्टीटयुट
३) श्वेता कॉम्प्युटर इन्स्टीटयुट
४) सुपर कॉम्प्युटर इन्स्टीटयुट

तसेच प्रशिक्षणाच्या कामात दर्जा व सुसुत्रता येणेकामी इतर संस्थांची नेमणुक करण्यात येऊ नये.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७३ विषय क्रमांक - ३४

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.आश्विनी चिंचवडे

संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.आश्विनी चिंचवडे यांचा प्रस्ताव -

निगडी प्राधिकरण, सेक्टर २६ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे लॉन टेनिस कोर्ट असुन त्यातील लॉन टेनिस कोर्ट नं.३ व ४ पिंपरी चिंचवड सामाजिक विकास मंच यांना पाच वर्षासाठी भाडेतत्वावर चालविण्यास देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७४ विषय क्रमांक - ३५

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.निता पाडाळे अनुमोदक :- मा.आरती चोंधे

संदर्भ:- मा.निता पाडाळे,मा.आरती चोंधे यांचा प्रस्ताव -

राष्ट्रीय व राज्यस्तरावर होणा-या स्पर्धा पिंपरी चिंचवड शहरामध्ये जी संस्था आयोजित करेल. त्या संस्थांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मैदाने विनामोबदला उपलब्ध करुन देणेत यावी त्याचप्रमाणे त्याअनुषंगाने मंडप,पाणी व इतर सुविधा उपलब्ध करुन देणेत याव्यात त्यामुळे आयोजकांना अशा प्रकारच्या स्पर्धा भरविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. व पिंपरी चिंचवड शहरात राष्ट्रीय व राज्यस्तरीय खेळाडुंना प्रोत्साहन मिळुन ते तयार होतील व पिंपरी चिंचवड शहराचे नावलौकीक

होण्यास मदत होईल. त्यामुळे राष्ट्रीय व राज्यस्तरावर होणा-या स्पर्धांना मनपाची मैदाने व इतर अनुषंगिक सुविधा (उदा.मंडप, पाणी व इ.) उपलब्ध करुन देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७५ विषय क्रमांक - ३६

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

मनपाच्या सन २०१२-१३ अंदाजपत्रक ३ मधील स्थापत्य उद्याने या लेखाशिर्षावर खालीलप्रमाणे अंतर्गत वाढ घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| पानांक | अ.क्र. | कामाचे नाव | करावयाची वाढ | करावयाची वाढ |
|---|---|---|---|---|
| ५१३ | २६ | प्राधिकरण से.क्र.२८ - ज्ञानेश्वर उद्यानातील जॉगिंग टॅकला पेव्हिंग ब्लॉक बसविणे व इतर कामे करणे. | १०००००० | ० |
| ५०२ | ७१ | गट नं.१ब येथे डियर पार्क विकसित करणे. | ० | १०००००० |
| | एकुण | | १०००००० | १०००००० |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७६ विषय क्रमांक - ३७

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.निता पाडाळे

संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.निता पाडाळे यांचा प्रस्ताव -

महानगरपालिकेच्या सन २०१२-१३ च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे. स्थापत्य ब प्रभागातील खालील कामासाठीच्या तरतुदी मध्ये फेरबदल करुन तरतुद वर्ग करुन त्यानुसार वाढ व घट करणेस मान्यता देणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | लेखाशिर्ष | पान/अ.क्र. | सन १२-१३ | वाढ | घट | सन २०१२ चा सुधारित अंदाज |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पुनावळे येथील | प | ९४४/९ | ५००,००० | १९९९००० | ० | २,४९९,००० |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | शाळा इमारतींचा विस्तार करणे | अंदाजपत्रक प प्राथमिक व दुय्यम शिक्षण | | | | | |
| २ | प्र.क्र.५२ ताथवडे येथे मुख्य रस्त्यावर सी.डी.वर्क बांधणे | पुल व प्रकल्प | २१९/२६ | २०००४०० | ० | १९९९००० | १४०० |
| एकुण | | | | | १९९९००० | १९९९००० | २५००४०० |

सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७७ विषय क्रमांक - ३८
दिनांक - ३१/७/२०१२
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोंनकांबळे
संदर्भः- मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

भारताचे प्रथम शिक्षण मंत्री सन्मा.भारतरत्न मौलाना अब्दुल कलाम आझाद यांची पिंपरी चिंचवड आकुर्डी येथील बिना इंग्लिश मेडीयम स्कुल, येथे दरवर्षी जयंती व पुण्यतिथी साजरी करणेकामी ऑल इंडिया मुशायरा कार्यक्रमाचे आयोजनास पिं.चिं.मनपाच्यावतीने सभा मंडप, स्पिकर,लाईट-डेकोरेशन,आसन बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी टँकर इ. अनूषंगिक कामे करणेकामी येणारे खर्चास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होण्याची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७८ विषय क्रमांक - ३९
दिनांक - ३१/७/२०१२
सुचक :- मा.सुषमा तनपुरे अनुमोदक :- मा.चंद्रकांता सोंनकांबळे
संदर्भः- मा.सुषमा तनपुरे,मा.चंद्रकांता सोनकांबळे यांचा प्रस्ताव -

मा.स्थायी समिती ठराव क्र.१६३३६ दि.१३/१२/११ यामध्ये दुरुस्ती करणेत येत असुन सदर ट्रेन खरेदीकामी येणारे एकुण र.रु.२,५०,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे. त्याऐवजी सदर ट्रेन खरेदीकामी येणारे प्रति नग र.रु.२,५०,०००/- याप्रमाणे एकुण र.रु.५,००,०००/- पर्यंतचे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ८७९ विषय क्रमांक - ४०

दिनांक - ३१/७/२०१२

सुचक :- मा.आरती चोंधे अनुमोदक :- मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.आरती चोंधे,मा.सुषमा तनपुरे यांचा प्रस्ताव -

शशिकांत शरद भदे रा.चिंचवडगाव यांना साऊंड ऑपरेटर कामाचा ८ वर्षे कालावधीचा अनुभव आहे. आचार्य अत्रे रंगमंदिरातील श्री.ज्ञानेश्वर काळे हे रंगमंच कामगार ३१ जुलै २०१२ रोजी निवृत्त होणार आहेत तरी श्री.शशिकांत शरद भदे यांस द.म.र.रु.६०००/- एकत्रित मानधनावर सहा महिने कालावधीकरीता साउंड ऑपरेटर म्हणुन नेमणुक करणेस(आचार्य अत्रे रंगमदीरामध्ये ) व त्याकामी येणारे प्रत्यक्ष खर्चास मान्यता देण्ेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**(जगदीश शेट्टी )**
सभापती
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/१०६३/२०१२
दिनांक - ४/८/२०१२ चे लगत

**प्र.नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी- ४११ ०१८**

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८,
## प्रपत्र - ब
## मा.विधी समिती सभा ठराव क्रमांक ३५ दिनांक २१/०७/२०१२ चे लगत

| अ. क्र. | | वस्तुचे ााव | प्रस्तावित दर |
|---|---|---|---|
| १३ | अ) | सर्व प्रकारची सुकविलेली किंवा जता केलेली फळे व कवचफळे डबाबंद मासळी, चीज, कफेक्शारी, मुरंबा व जेली, आईसक्रिम, सर्व प्रकारचे पिठूळ अन, लोणची, कोको व कोकोच्या बीया, चॉकलेट्स, बिक्स्कटे व केक, प्राण्यांची पातळ चरबी (लार्ड ) किंवा प्राण्यांची खाद्य चरबी, मावा, दुधाची मलई, चक्का, फळांचे रस, सरबते व सर्व पेये, बेव्हरेजेस (उदा. कोकोकोला, पेप्सी इत्यादी सारखे) ग्लुकोज, डेस्ट्रोज किंवा कोणतीही कलशर्करा (खाद्य तेलाव्यतिरिक्त) तेल्याच्या दुकाातील माल, परिरक्षित किराणामाल, बेकिंग पावछर, सॅकरिा, सर्व प्रकारचे खाद्य रंग व अर्क, इतर सर्व प्रकारचे ग्लुकोज, सातुचे वाळवीलेले सत्व, (माल्ट एक्स्ट्रॅक्ट) मध, पापड, सर्व प्रकारचे वेफर्स, शेवई, कोणत्याही वापरासाठी संस्करण केलेले मांस, क्स्कमड मिल्क पावडर, ाािरा व सर्व प्रकारचे अन किंवा पेय आणि सर्व प्रकारचे काजू व काजू बिया | ४.०० |
| | ब) | एरिएटेड वॉटर, मिारल वॉटर, विशुध्द जल | ४.०० |
| ३१ | | फटाके, दारूकाम व त्याचे घटक, सेफ्टी फ्युज | ४.०० |
| ४४ | | सर्व प्रकारचे सिमेंट,साला (सागोळ) | ४.०० |
| ४५ | | डांबर (कोल टार) अस्फाल्ट, बिटयूमो, फरसबंदी दगड, मँगाजि,इमरी दगड किंवा खडी, दगडाच्या चिपा (स्टोा चिप्स) दगडाची धातूखळ, आग्रा दगड, इमारती दगड, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित धातूखळ, डांबर मिश्रित कच (ग्रिट) सिमेंट मिश्रित खडी (तयार कॉंक्रीटचा माल) | ४.०० |
| ४६ | | चकाकी दिलेल्या विटा व फरशा (टाईल्स), संगमरवरी दगड, भटटीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छप्परी कौले,पलोअरींग टाईल्स,फरशीच्या लाद्या इ.चायाा मोझाईक चिप्स, मोझाईकचा सगमरवरी दगड,मोझाईक किंवा टेरेझ ाोची कौले, चिाी मातीचे पांईप, मातीचे पाईप, सिमेंटचे पाईप, अस्बेस्टॉस सिमेंट पत्रे,सिमेंटच्या कुंडया,ाक्षीदार जाळया सारख्या वस्तू,सिमेंट ब्लॉक्स व ग्रॅााइड | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ५२ | | प्लायवूड, सॉपटबोर्ड, हार्डबोर्ड, मॅसोाइड किंवा कोणतेही घटक असलेले व कृत्रिम प्रक्रियेो तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासूा तयार करण्यात आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड व त्यापासूा तयार केलेल्या वस्तू व सर्व प्रकारचे फर्चिर, सामायका, फॉरमायका आणि सर्व प्रकारचे प्लायवूडस् | ४.०० |
| ५३ | अ) | केसाचे तेल , सुगंधी तेले, सर्व् प्रकारचे सुगंधी द्रव्ये, सेंटस् , अत्तरे, सुगंधीत वस्तू, उदबत्या, सुगंधी रसायो, प्रसाधागृहांसाठी आवश्यक असणा-या सर्व प्रकारच्या वस्तू, दाढीचे क्रीम, दाढीचा साबण, दंतमंजा, दाताची पेस्ट, पोमेड, फण्या, कंगवे, ब्रश, केसाच्या पिाा, ब्रेसेस, गार्टर्स, सस्पेंडर्स, उदा.धूप, लोबाा | ४.०० |
| ५३ | क) १ | लेसेस,टेप्स, लाकडी व धातूच्या रिंग्ज,भरतकामाच्या वस्तू, सेल्यूलाईड व सेल्यूलाईडच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, कृत्रीम मोती, बेकेलरइट व बेकेलाइडच्या वस्तू, हस्तीदंत व हाडे यापासूा बाविलेल्या वस्तू, सर्व प्रकारची बटणे(शर्ट इ.वस्तूंचे) िकरकोळ जिनस, हॅबरडॅशरी, बूट लेसेस ब्लँको, ब्रासो,छत्र्या व छत्र्यांचे सामाा, काठया,चाबूक, टेप्स, कॅाव्हासच्या पिशव्या, होल्डॉल्स,प्लेइंग बॉल्स, गोटया, पॉलिश पेपर्स,बुचे,गंध, फिशिंग रॉड आणि इतर फॅसी गुडस्, रक्षाबंधााच्या राख्या | ४.०० |
| ५३ | क(३) | सर्व प्रकारच्या प्लॅस्टीक पिशव्या | ८.०० |
| ५३ | ड) | लाकडी, लोखंडी, पोलादी, वेताचे, प्लॅस्टीक व फायबर इ.सारखे सर्व प्रकारचे फर्चिर | ४.०० |
| ७४ | ई) | संगणक त्यांचे घटक व सुटे भाग व संगणकाच्या मायक्रोचिप्स, कुलिंग सिक्स्टम बावण्यासाठी आयात होणारा माल, फ्लॉपी, सीडी, बॅकअप मशिा, कार्टेज, सर्व प्रकारचे सॉफ्टवेअर अशा व इतर वस्तू. | ४.०० |
| | ह) | मोबाईल, पेजर, सिमकार्ड, सिमकार्ड ॲक्क्टवेशा/ रियुअल स्लीप कुपा इत्यादी. | ४.०० |
| ७५ | अ) १) | मोटारी, मालमोटारी, सर्व प्रकारची साधो, कार, बसेस, क्रो, ट्रेलर, टेम्पो, रिक्षा, फोर्कलिफ्ट, एक्सेव्हेटर्स, सर्व प्रकारची प्रवासी साधो, रोडरोलर्स, बुलडोजर्स, ट्रॅक्टर्स, कॉंक्रिट मिक्सर, जीप, सर्व प्रकारच्या वाहाांच्या चॅसीज तसेच विशेष रित्या तरतूद ा करण्यात आलेली सर्व प्रकारची देशी व विदेशी वाहो. | ४.०० |
| | | मोटर सायकल, स्कूटर्स, मोपेड्स | |
| ७६ | अ) | उपकरणे, उपकरण संचा व उपयंत्रे व त्यांचे भाग शिवणयंत्रे व शिवणकाम व विणकामाची एम्ब्रॉयडरी यंत्र, ओव्हर लॉकिंग व इंटरलॉकिंग यंत्र, सर्व प्रकारची सर्व घडयाळे, टंकलेखा यंत्र, इलेक्ट्रॅाकि टंकलेखा यंत्र व त्यांचे सुटे भाग व घटक भाग. | ४.०० |

| | | | |
|---|---|---|---|
| ७६ | ब) १) | रेडिओग्राम उपकरण संच, ग्रामोफोस, ॲक्म्प्लफायर्स, वायरलेस (यंत्र), सर्व प्रकारची संगीत वाद्ये, ऑडिओ-व्हिडिओ कॅसेट्स, मायक्रोफोस, व्हिडिओ गेम्स, वॉकमा, टेलिफोा संच, फॅक्स संच, दूरध्वाी संचासाठी वापरण्यात येणारे अंतर्गत साहित्य, लॅपटॉप संच, इंटरोट आणि वेबसाईट मशीारी आणि त्यांचे घटक भाग, सुटे भाग आणि पूरक भाग, तयार (रेडिमेड) रेडिओ, टेपरेकॉर्डर दूरदर्शा संच, सर्व प्रकारचे व्स्पकर्स, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हसीडी आणि व्हसीआर. | ४.०० |
| ७६ | ब) २) | सर्व प्रकारचे रेडिओ, दूरदर्शा संच, सर्व प्रकारचे व्स्पकर, साउंड सिव्स्टम, टेपरेकॉर्डर, सीडी प्लेअर, डिव्हीडी, व्हसीडी आणि व्हसीआर तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे घटक व सुटे भाग तथापि, इतरत्र विशिष्टरित्या ामूद केलेले  घटक भाग, सुटे भाग, पूरक भाग वगळूा. | ४.०० |
| ८६ | | वरील कोणत्याही बाबीत समाविष्ट ा केलेल्या व आुसूची २ मध्ये विशेषतः सूट देण्यात ा आलेल्या माल व वस्तू | ४.०० |
| | | | |

**सभापती**
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.